# प्रशिक्षण कुठे - केंव्हा - कशाचे - कोणाकडून

सहकारी चळवळीतील कार्यकर्त्यांना व सेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी देश पातळीवर – राज्य पातळीवर – विभागीय पातळीवर – जिल्हा पातळीवर – तालुका पातळीवर व गाव / बोर्ड पातळीवर कायद्यानुसार अनेक दालने उपलब्ध आहेत. यामध्ये **महाराष्ट्र राज्य सहकारी संघ** ही राज्यस्तरीय शिखर संस्था संपूर्ण राज्यात १९१८ सालापासून सहकारी संस्थांसाठी कार्यरत आहे. शिवाय सहकार कायद्यानुसार नोंदणीकृत विविध प्रकारचे फेडरेशनस् हे काम आपापल्या पध्दतीने राज्यभर करीत असतात. नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ को. ऑप. युनियन (NCUI)या देश पातळीवरील संस्थेच्या माध्यमातून देखील महाराष्ट्र राज्यात पुणे येथील कै. वैकुंठभाई मेहता येथे सुध्दा सहकारी संस्था मधील कार्यकर्ते व सेवकांना प्रशिक्षण दिले जाते आणि अलिकडे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील पुणे येथील 'यशदा' नावाची संस्थादेखील आपली कार्यकक्षा सोडून बेकायदेशीररित्या व जबरदस्तीने सहकारी संस्थांमधील कार्यकर्ते व कर्मचाऱ्यांना भरमसाठ व अनाठायी शुल्क आकारुन प्रशिक्षणाचे काम करीत आहे.

थोडक्यात, सहकारी संस्थांमधील कार्यकर्ते आणि कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षीत होण्याची किती आवश्यकता आहे हे आपल्या लक्षात येईल. एक-एक संस्था पुन्हा – पुन्हा प्रशिक्षण घेण्याच्या घेऱ्यामध्ये आल्याचे दिसते. परंतु त्याचा परिणाम त्या सहकारी संस्थेच्या निकोप व योजनाबध्द वाढीसाठी व्हायला पाहिजे हे अपेक्षित आहे. भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड, सहकार खाते यांच्या माध्यमातून विविध विषयांवर विविध प्रकारे काढलेले व लागू केलेले आदेश, निर्गमीत केलेली परिपत्रके यामुळे राज्यातील पावणे दोन लाख विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी ९९ टक्के सहकारी संस्था प्रशिक्षणाची महती समजूनही त्याचा फायदा व नेमके परिणाम त्या सहकारी संस्थेस पूर्णपणे देण्यास यशस्वी झाले असे धाडसी विधान करता येणे शक्य नाही. उदाहरण द्यायचे असेल तर सीडी रेशो, एम.आय.एस. लागू केल्यापासून त्याचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र मिळवूनही तदनंतरच्या कालावधीत वरील विषयाची सांगड १०० टक्के बसविता आली नाही. हे कटू सत्य आहे. कारण लेखापरिक्षणाच्या वर्गवारीच्या मोजमापात प्रशिक्षणासाठी ५ मार्क आरक्षित केलेले आहेत. आणि त्याची पूर्तता प्रामाणिकपणे सर्व ठिकाणी होत असल्याचे निदर्शनास येते. परंतु घेतलेले प्रशिक्षण जसेच्या तसे आपल्या संस्थेत राबविण्याचा संकल्प व तशा आशयाचा ठराव करण्याची आवश्यकता असताना सहसा कोणीही आग्रही दिसत नाही. आणि त्यामुळे प्रशिक्षण कुठे-केंव्हा-कशाचे व काय किंमत मोजून घ्यायचे याचे कोष्टक अद्यापही निश्चित झालेले नाही. यासाठी शासन किंवा सहकार खाते यांच्या आदेशाची किंवा परिपत्रकाची गरज नाही. एवढेच नव्हे तर सहकारी संस्था नोंदणी अधिकाऱ्याच्या सहीने प्रशिक्षण कुठे घ्यावे असे सांगणे हे संपूर्णपणे बेकायदेशीर व सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांना आव्हान आहे. केवळ त्यांचे आदेश किंवा विनंती वजा पत्रांची दखल घेतली नाही तर सहकार खाते आपली संस्था कुठल्याही माध्यमातून अडचणीत आणील. कलम ७८,८३,८८ व वेळ पडल्यास पोलिस केसेस आपल्यावर टाकल्या जातील या भितीपोटी निमुटपणे बेकायदेशीर आदेश सहकारी संस्था पाळत असल्याचे दृष्टीक्षेपात येत आहे. आणि ही बाब अत्यंत गंभीर व या महाराष्ट्र राज्याला लांच्छनास्पद आहे.

राज्यात सहकारी कायदा उपलब्ध असताना ज्याचे – त्याचे अधिकार व कर्तव्य स्पष्ट असताना सरकारच्या माध्यमातून संबंधित अधिकारी एवढे धाडस कसे काय करतात हे आश्चर्य आहे. यांना शासन कसे आडवत नाही हाही यक्ष प्रश्न आहे. परंतू आता सरकार या प्रश्नी संबंधितांवर केलेल्या बेकायदेशीर कृत्यावर आसूड उगारेल असे आशेचे किरण सुदैवाने दिसत आहे. आणि म्हणून सहकारी कार्यकर्ते व कर्मचारी यांनी आपल्या संस्थेचा उपविधी व

सहकार कायदा वाचून त्याच्या अंमलबजावणीसाठी आग्रही राहिले पाहिजे. आणि प्रशिक्षण हा त्यावरील एकमेव उपाय आपल्या सर्वांपुढे उपलब्ध आहे.

एका दिवसाचे ८०० ते १००० रुपये प्रशिक्षणासाठी घेवून उपलब्ध असलेली शासनाची कायम मोकळी राहणारी निवासस्थाने उपलब्ध करुन आमच्यातीलच व्याख्याते तेथे बोलावून प्रशिक्षणाच्या नावाखाली लाखो रुपये बेकायदेशीरित्या 'यशदा' या पुण्यातील संस्थेमार्फत राज्यातील सहकारी संस्थाकडून प्रत्यक्ष – अप्रत्यक्षरित्या धाकधडपशा दाखवून खंडणी वसूल करण्यासारखे गोळा केले. याचा परतावा 'यशदाला' संबंधित संस्थांना निश्चितपणे द्यावा लागणार आहे. त्यासाठी संयमाची व धारिष्ट्याची गरज आहे. जहाजाला अजून मोठी छीद्रे पडलेली नाहीत. उंदीर आपोआप बिळातून बाहेर पडल्याशिवाय राहणार नाही. यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. प्रशिक्षणाच्या नावाखाली पुण्याला बोलवायचे,किमान एका दिवसाचे ८०० रुपये मोजावयाचे व याव्यतिरिक्त प्रवासखर्च व इतर अनुषंगिक खर्च होऊन एका संस्थेने सरासरी किमान एका प्रशिक्षणासाठी प्रतिदिन रुपये २०००/– खर्च करावयाचे ही सहकारी संस्थांची लूट सहकारी संस्थांवर नियंत्रण करणाऱ्या व्यवस्थेने राजरोसपणे राज्यकर्त्यांनासुध्दा न घाबरता करावी हे महाभयंकर षडयंत्र आहे.

म्हणून प्रशिक्षणांची संकल्पना प्रत्येक संस्थेने स्वत:हून ठरावाद्वारे अंगिकारली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत प्रतिदिनी प्रति प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त प्रशिक्षण शुल्क, चहा, नाश्ता, प्रवासासह रुपये ३०० पेक्षा जास्त होता कामा नये. याची नोंद स्वत:हून घेतली पाहिजे. अन्यथ: **प्रशिक्षणाच्या नावाखाली संस्थेच्या शिल्लक राहणाऱ्या नफ्याचे प्रमाण उतरत्या भांजणी नुसार होण्यास वेळ लागणार नाही,** हे कालांतराने सर्वांच्या लक्षात येणारच आहे.

प्रत्येक गाव / वार्ड – तालुका – जिल्हा – विभाग स्तरावर, अत्यल्प खर्चामध्ये दर्जा कायम ठेवून आपल्या सहकारी संस्थेची निकोप व योजनाबद्ध वाढ होण्यासाठी तशी व्यवस्था, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, विविध फेडरेशनस् यांचेकडे उपलब्ध असून फायदा उचलण्याची नितांत आवश्यकता आहे. कुठल्याही परिस्थितीत काळ सोकवता कामा नये.

ठेवीवरील व्याज, दैनंदिन ठेवीवरील व्याज व ठेव जमा करण्यासाठी दिले जाणारे कमिशन, स्टेशनरी, फर्निचर, जागा व अद्यावत सुधारणांसाठी करावयाचा खर्च यासाठी अनेक आदेश व परिपत्रकांची वास्तविक नितांत गरज महाराष्ट्र राज्याच्या सहकारी संस्थांना आहे. वाहनावरील खर्च व कर्मचाऱ्यांवरील खर्च यासाठी योग्य दिशा देण्याचे फार मोठे काम सहकार खात्याला चर्चा करुन ठरविणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर सहकार कायद्यातील त्रुटी व आवश्यक बदल ह्यासाठी सहकारी संस्था नोंदणी अधिकाऱ्यांनी समन्वयाकाची भूमिका स्विकारण्याचे काम अद्यापही शिल्लक आहे. आणि हे सर्व प्रशिक्षणाच्या नावाखाली अवाढव्य शुल्क आकारुन सहकार खात्याला करता येणार नाही, हे राज्यकर्त्यांनी फतवा काढून सिध्द करण्याची नितांत आवश्यकता आहे.'' **ऑडिट '' सारखे अति महत्वाचे प्रश्न ४० टक्के** कमीशन घेवून सोडविले जातात, यापेक्षा या राज्याचा अपमान होऊ शकत नाही. राजकर्त्यांनी ही बाब दुर्लक्षुन चालणार नाही. कुंपण कुणाचे व त्याचे संरक्षण काय किंमत मोजून करावयाचे हे ठरविण्याची वेळ आता आलेली आहे. कायदा करणारे व त्याची अंमलबजावणी करणारे यातील फरक समजावून सांगण्याची गरज आहे. लाभार्थी कोण? हे सुध्दा ठरविण्याची वेळ आलेली आहे. कर्ज रुपाने लाखो / करोडो रुपयांच्या रकमा स्वत: प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहभागी होऊन लाभ मिळवायचा व ते कर्ज थकवायचे, त्यासाठी नैसर्गीक, सामाजिक व सहकारी तत्वाची सांगड पुन्हा घालायची हे ह्या चळवळीतील कटू परंतु विदारक सत्य आहे. आणि या सर्वांसाठी प्रशिक्षण हा एकमेव उपाय सहज कमी खर्चात, कमी वेळेत व दर्जेदार अंमलबजावणी

होण्यासारखा असावयास पाहिजे.

एकंदरीत सहकारातील कार्यकर्त्यांनी व कर्मचाऱ्यांनी उपविधी व कायद्याच्या चौकटीत राहून न डगमगता तत्वाशी ठाम राहून या चळवळीत पुन्हा एकदा धाडसाने सक्रिय होण्यासाठी प्रशिक्षण कुठे – केंव्हा – कसे व कोणाकडून हे निश्चित करणे क्रमपात्र आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**